
# गरुड झेप

www.janatabankpune.com

सन २०१५ – अंक १ ला (जनता सहकारी बँक लि., पुणे द्वारा प्रकाशित गृहपत्रिका : केवळ खाजगी वितरणासाठी)

## अध्यक्षांचे लेखणीतून,



गेल्या वेळचा गरुडझेप चाळतांना त्यात पानपूरक म्हणून एके ठिकाणी २ सुविचार छापलेले बघितले. त्यातील एक होता की, अपयशाची कारणे दोन्ही पैकी एक – विचारपूर्वक कृती न करणे किंवा फक्त विचार करणे व कृती न करणे. खूप सुंदर विचार मांडला आहे हा. शाखाव्यवस्थापक व सेवक यांना संबोधित करण्याचा प्रसंग अनेकवेळा येतो. बँकेच्या कामांबाबत तसेच विविध उद्दिष्ट्ये साध्य करण्याबाबत मार्गदर्शनपर अनेकवेळा बोलावे लागते. कधी कधी शाखा एखाद्याच ठराविक व्यवसायात खूप चांगली प्रगती करते कारण त्या भागात उपलब्ध असलेल्या व्यवसायाच्या संधी कारणीभूत असतात. त्याच बरोबर व्यवसाय मिळवण्यासाठी नियोजनपूर्वक व सातत्यपूर्ण प्रयत्न ही आवश्यक असतात. नियोजन करण्यापूर्वी परिस्थितीचा अभ्यास करावा लागतो. नक्की काय प्रकारच्या संधी उपलब्ध आहेत, त्यांचा उपयोग व्यवसायात कसा रुपांतरीत होऊ शकेल, हा व्यवसाय मिळविण्यासाठी कोणाला भेटावयास हवे, नक्की काय स्वरुपाचे प्रयत्न करावयास हवेत. कोणाची मदत होऊ शकेल याबाबींचे काही नियोजन करावयास हवे. तद्नंतर त्याप्रमाणे प्रयत्न करावयास हवेत. या बरोबरच आजच्या काळात विचार करावा लागतो आपल्या स्पर्धकांचा. आपले स्पर्धक नक्की कोण आहेत? त्यांची बलस्थाने काय? त्याबाबत ग्राहकांना आपण कसे पटवून देऊ शकू? आपली बलस्थाने काय व त्याचा ग्राहकांना फायदा काय? आपण स्पर्धकांपेक्षा सरस आहोत का व असल्यास कोणत्या बाबतीत? या बाबत आपल्याकडे मांडण्यासाठी निश्चित असे मुद्दे असावयास हवेत. हे असेल तर आपल्या प्रयत्नांना व ग्राहकांना समजावून सांगताना निश्चित असे मुद्दे असावयास हवेत. हे असेल तर आपल्या प्रयत्नांना व ग्राहकांना समजावून सांगताना निश्चित प्रकारची दिशा राहील. आपले स्पर्धक कशाप्रकारे त्यांचा व्यवसाय वाढवतात, आपल्या ग्राहकांच्या गरजा काय आहेत, अपेक्षा काय आहेत हे ही जाणून घेणे आवश्यक आहे. ग्राहकांच्या गरजा व अपेक्षा दोन्ही लक्षात घेऊन आपण आपल्या योजनांमध्ये काय सुधारणा करावयास हव्यात याचा विचार करायला पाहिजे. व्यवसाय करतांना आपण विविध नियम, कायदे, रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सूचना यांचा भंग करीत नाही याचे भान ठेवावयास हवे. विचारांना साथ प्रयत्न व मेहनतीची हवी म्हणजे विचारांचे रुपांतर साध्य साधण्यात होईल.

वर नमूद केलेल्या सुविचाराचा उर्वरीत भाग म्हणजे निव्वळ विचार करणे व कृती न करणे हा आपण नक्कीच टाळावयास हवा. केवळ चांगले विचार करणे व नियोजन करणे यास प्रयत्नांची साथ हवी. प्रसिद्ध संतवचन आहे की, ''क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे'' आपण फक्त विचार व चर्चा करणार नाही ते कृतीत आणू शकतो हे पूर्वी अनेकवेळा सिद्ध केले आहे. गरज आहे ती सातत्याची, असे सातत्य ही आपण निश्चितच दाखवू शकतो याबद्दल मी नि:शंक आहे, तुमच्या नियोजनाला व प्रयत्नांना हार्दिक शुभेच्छा!

**– अरविंद खळदकर**

## आपल्या बँकेने प्राप्त केली बँकिंग फ्रंटियर्स ॲवॉर्डस!



बँकिंग फ्रंटियर मासिकातर्फे हैदराबाद येथे संपन्न झालेल्या कार्यक्रमात आपल्या बँकेला बँकिंग फ्रंटियर ॲवॉर्डस प्राप्त झाले आहेत व या सोहळ्यात आपल्या बँकेला पाच ॲवॉर्डस प्रदान करण्यात आले आहेत.

- १ बेस्ट डाटा सेंटर ॲन्ड डी.आर साईट अपग्रेडेशन
- बेस्ट पेपरलेस बँकिंग
- बेस्ट ब्रांच इनिसिएशन
- बेस्ट NPA मॅनेजमेंट
- बेस्ट HOD of IT डिपार्टमेंट (श्री. कामत)

सहकारी बँकिंग क्षेत्रातील ही अतिशय प्रतिष्ठित ॲवार्डस प्राप्त केल्याबद्दल आपल्या संपूर्ण टीमचे हार्दिक अभिनंदन!

बँकिंग फ्रंटीअर ॲवॉर्ड संदर्भातील ५ पैकी ३ ॲवॉर्डस ही माहिती तंत्रज्ञान विभागा संदर्भात आहेत. माहिती तंत्रज्ञान संदर्भात आपल्या बँकेने खालील प्रकारे कार्यवाही केलेली आहे.

१. पेपरलेस बँकिंग – सर्व सेवकांना एक स्वतंत्र युजरनेम व पासवर्ड दिलेला आहे. त्याद्वारे प्रत्येक सेवक इंट्रानेट वेबसाईट बघू शकतो. सदर वेबसाईटवर परिपत्रके, पॉलीसीज वगैरे उपयुक्त माहिती दिलेली आहे. शाखा, विभाग, वरिष्ठ अधिकारी सर्वांना इंट्रानेटद्वारे ई मेल फॅसिलीटी उपलब्ध करून दिलेली आहे. या व्यतिरिक्त कॉर्पोरेट ई मेल आय. डी. दिलेले असून त्याद्वारेही ई मेल फॅसिलीटी उपलब्ध करून दिलेली आहे. पगार व रजा या संदर्भातील कामे सिस्टीम द्वारा करण्याची सोय केलेली आहे. सेव्हिंग, करंट, कॅश क्रेडीट वगैरे खात्यांचे उतारे ई मेल द्वारा उपलब्ध करून देण्याची सोय केलेली आहे.


पान क्र. ७ वर ▶

# 'नवल वर्तले' पुस्तक म्हणजे यशाचा मार्ग दाखविणारा अनुभवसिद्ध 'प्रकाशाचा दिवा'

जनता सहकारी बँक व माझे हे दीर्घ काळपासूनचे संबंध आहेत. उदा. भागधारक, सभासद, खातेदार व निव्वळ कर्जदार नव्हे तर नियमितपणे कर्ज फेडणारा कर्जदार म्हणून. आज मी श्रोता म्हणून येणारच होतो. सहकारामध्ये सामान्य माणसाला पत आणि प्रतिष्ठा मिळते. जनता बँक गेली ६४ वर्षे हे करीत आहे. बँकेचा खरा आधारस्तंभ ग्राहक असतो. आज 'कै.मोरोपंत पिंगळे' यांचे नावाने समाजहितासाठी काम करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना पुरस्कार दिले जात आहेत. समाजामध्ये जशा वाईट गोष्टी असतात तशा चांगल्याही खूप गोष्टी असतात. चांगल्या गोष्टींना अवश्य पाठबळ दिले गेले पाहिजे. समाज हितासाठी व राष्ट्रहितासाठी आपले आयुष्य कारणी लावणा-या मोरोपंताचे स्मारक म्हणजे पुतळा किंवा इमारत नव्हे तर 'हे पुरस्कार' म्हणजे चैतन्यशील स्मारक होय. संस्थेचे वय वाढले की संस्था जास्त सतेज, तजेलदार, तरूण होते. जनता बँक या संस्थेला ६५ वर्षांचा इतिहास आहे. हा इतिहास म्हणजेच 'नवल पर्व' नव्हे. मध्यंतरी १२-१४ वर्षे एक संकटपर्व आले होते. अशा वेळी संस्थेचे अस्तित्व धोक्यात आले काय, अशी शंका काही जणांना येवू लागली. अशा शंका आवडणारे काही लोक असतात. अशा शंकांना उत्तर म्हणजे संस्थेचे अस्तित्व टिकवणे व संस्था अधिक बळकट करणे, हे कसे केले ते सांगणारा हा ग्रंथ आहे. नवल वर्तले हे माहिती होते पण हे नवल कसे वर्तले हे या ग्रंथातून कळते, हा खूपच आकर्षक ग्रंथ झाला आहे. मध्यंतरीच्या काळात अनेक संस्था बुडाल्या. हा बुडण्याचा इतिहास नाही तर बुडता बुडता वाचण्याचा आणि घडण्याचा इतिहास आहे. हा पराभवाचा इतिहास नाही तर हा विजयाचा इतिहास आहे, परंतु पराभूत होवून परत विजयी होण्याचा इतिहास आहे.

कवी वसंत बापटांच्या काव्यपंक्ती आहेत - ''पराभूताची राणी असते सगळयात शहाणी''

यश वा विजयी होणे याचा अनुभवाचा पोत एकच, तो म्हणजे आनंद. पण पराभवामुळे अनेक गोष्टी शिकायला मिळतात, अनुभवांचे क्षितीज विस्तारते, असे क्षितीज विस्तारलेली




**दि.१८/१०/२०१४ रोजीच्या कार्यक्रमात लोकमत वृत्त समूहाचे वरिष्ठ संपादक श्री.विजय कुवळेकर यांनी ''नवल वर्तले'' पुस्तकाचे प्रकाशन प्रसंगी व्यक्त केलेले मनोगत -**

ही एक बँक आहे. त्यातून ही एक सहकारी बँक गेल्या काही वर्षात सहकार क्षेत्राभोवती संशयाचं गडद सावट आहे. हा संशय वा हे सावट भ्रष्टाचार, गैरप्रकार, मनमानी कारभार, राजकारण्यांचा नको तितका हस्तक्षेप यांचे आहे. यामुळे अनेक संस्था अडचणीत आल्या आहेत. अशा संस्थांमध्ये काम करणारी माणसे, संस्थेवर अवलंबून असणारी माणसे, संस्थेत गुंतवणूक करणारी माणसे या ज्या सर्वांच्या अस्तित्वाचा हा प्रश्न असतो ती भरडून निघाली. अशा अनेक पतसंस्था व बँका आहेत. त्यांची मी नावे घेत नाही. परंतु फक्त पुण्याचा विचार केला तरी अनेक नावे व घटना आठवतात. मी प्रसार माध्यमांमध्ये काम करतो. बँका, पतसंस्था व प्रसार माध्यमे यात एक साम्य आहे. यांचे भांडवल पैसा हे नाही, विश्वासार्हता हेच यांचे भांडवल आहे. लोक येथे पैसा ठेवतात, कारण त्यांचा त्या बँकेवर असलेल्या विश्वासाचे ते प्रतिक असते. ते पैसा नाही, तर विश्वासच हवाली करतात. ही विश्वासार्हता जतन करण्याचे काम संस्थेचे धुरीण करीत असतात. विश्वास उडाला की परिवर्तन होते, विश्वास दृढ झाला तरी परिवर्तन होते. सामाजिक क्षेत्रातील परिवर्तन हे जनमानसातल्या विश्वासावर अवलंबून असते. जनता बँकेत घडलेले परिवर्तन हे अशा विश्वासाचं प्रतिक आहे. त्याची संपूर्ण कथा, ऐतिहासिक यशोगाथा म्हणजेच 'नवल वर्तले' हे पुस्तक होय. विश्वासार्हता अगदी प्रथम पासून जपली आहे. स्वर्गीय दत्तोपंत जमदग्नींच्या कालखंडापासून म्हणजे १९४९ पासून कर्जदारांची विश्वासार्हता सुध्दा तपासली जाते. नागरी सहकारी बँकांतील अत्यंत वेगळा व वैशिष्ठ्यपूर्ण, आश्चर्य वाटावा असा हा इतिहास आहे. प्रशासक येणार का, संस्था बुडणार का, अशा अनेक शंका असत. ही १२-१४ वर्षे अत्यंत बिकट होती. बाहेरून दिसायला ठीक वाटेल पण आतून सहन करणे अत्यंत अवघड आहे. त्या सर्वांच्या मन:शक्तीला सलाम!

सर्व प्रकारचे आरोप, शंका कुशंका, अफवा, आक्षेप यांच्या जाळयातून स्वत:चं मनोधेर्य टिकवायचे, कर्मचा-यांचे मनोधैर्य टिकवायचे, समाज मनाचा विश्वास ढळू द्यावयाचा नाही ही कसरत सोपी नाही. मा. श्री. खळदकर साहेब म्हणाले, ते खरे वाटते, की कोणती तरी 'अदृश्य दैवी शक्ती' ह्यास कारणीभूत असेल, ही शक्ती अदृश्य आहे, हे चांगले. कारण रोज ती वापरली जावयास नको. हा १४ वर्षांचा काळ चिंतेचा होता. या चिंतेचे रूपांतर चिंतनात करून प्रकाशाचा मार्ग दिसतो. ही बँक बुडाली नाही, तर तरली. केवळ तरलीच नाही तर प्रगतीच्या आधुनिक बँकींगच्या क्षेत्रात झेपावत राहिली. याचे अगदी आत्ताचे उदाहरण म्हणजे ई बँकींग होय. ही बुडेल अशी वाटणारी बँक आता उड्डाणाला सिध्द झाली आहे ह्याचे एक उदाहरण पुस्तकात दिले आहे. बँकेचे संचालक 'श्री. सुधीर पंडीत' हे रिझर्व्ह बँकेमध्ये गेले असता तेथील वरिष्ठ अधिकारी त्यांना म्हणाले की, You have brought a Dead Body to me. तुम्ही माझ्याकडे एक प्रेत घेवून आला आहात. केवढं मोठं आव्हान होते ते. हे बघूनच खरे म्हणजे अवसान गळाले असते. परंतु

संचालकांनी ठरविले की, या प्रेताचे रूपांतर हे एका चैतन्यशील सजीवात करावयाचे आहे. त्या करीता अविश्रांत श्रम केले गेले. त्याचा हा इतिहास आहे. या पुस्तकाच्या लेखनाची अनेक वैशिष्ठ्ये आहेत. यात स्पष्टता व परखडपणा आहे, पण शेरेबाजी नाही, शिवराळपणा नाही, यात संयम सोडलेला नाही. हे अधिक परिणामकारक होण्याकरीता आक्रमकता नाही, केवळ शब्दांचे बुडबुडे नाहीत, उगाच तज्ज्ञतेचा अभिनिवेश नाही. मा.खळदकरांनी सांगीतले आहे की, ते इन्कमटॅक्स मध्ये होते, बँकींग मधील नव्हते. त्यांना माणसे राखणे अवघड जाते. कोणी अरे केल्यास त्याला कारे करायचे असा त्यांचा स्वभाव आहे. त्यांनी कारे केल्यावर ते सांभाळून घेणारी माणसे भोवती लागतात, याचा मेळ घातला गेला. ते स्वत: क्रियाशील अभ्यासक आहेत. लिखाणात संदिग्धता नाही, केवळ दूरून अभ्यास केला. प्रक्रियेत नसेल तर आत्मीयता, अधिकारवाणी, ओलावा त्यात नसतो. निव्वळ निवेदन रसरशीत होते, वर्णन चांगले होते पण ते आतून येत नाही त्यात आत्मा नसतो. संकटकाळामध्ये झळा स्वत: सहन करणारे ते क्रियाशील स्वयंसेवक होते. संस्थेला अडचणीच्या काळातून बाहेर काढताना इतरांबरोबर झटणारे क्रियाशील स्वयंसेवक होते. अशा सर्वांची ही यशोगाथा आहे. त्यात ओढ आहे, आत्मीयता आहे, तळमळ, ओलावा, चिंता आहे. त्याला अधिकृततेचे अधिष्ठान आहे. ज्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुशीतून हे सर्वजण तयार झाले तेथे ''मी'' नाही, ''आम्ही'' असतो. या विचारधारेचे हे प्रतिक व हा त्याचा इतिहास आहे.

संस्था बुडते, वाढते, तरते ही आतल्या माणसांच्यामुळेच. प्रामुख्यांने जबाबदार असतात ती आतली माणसे. बाहेरची माणसे, ही त्यांचा वाटा उचलतातच. आतल्या म णसांनी निर्माण केलेली संकटे आतल्या माणसांनीच निवारली. सभासद, कर्मचारी, खातेदार व निरपेक्ष संचालक या सर्वांबद्दल पानोपानी कृतज्ञता भरलेली आहे. साने गुरूजींनी सांगीतले आहे की, 'कृतज्ञते इतके सुंदर काही नाही.' पु.लं. नी त्यात वाढ केली की, ''कृतघ्नते इतके कुरूप काही नाही.'' आत्ताच आपण कृतज्ञतेचा एक सामाजिक संस्कारही बघितला. या सर्वांना श्रेय तर आहेच परंतु आजच्या जगात आश्चर्य वाटणारी गोष्ट म्हणजे ७ वर्षे पगारवाढ न घेता काम करणारी माणसे. पैसा हे सर्वस्व आहे, त्या मागे सर्वजण धावतात. ही एक आपली बँक आहे व ही बँक वाचली पाहिजे असे म्हणून पगारवाढ न घेणाऱ्या कर्मचाऱ्यांना मानाचा मुजराच करायला पाहिजे. त्यांचा वाटा खरोखरच खूप मोठा आहे. तसेच सभासद, खातेदार यांनी पळ काढला नाही. संचालक हे बँकेवर अवलंबून नव्हते, त्यांना बँकेकडून अपेक्षाही नव्हत्या. पण सर्वांचे एकच लक्ष्य होते, 'बँक बुडू द्यावयाची नाही'. कठोर, कडक व ठाम निर्णय घ्यावे लागले. मान, अपमान, अपयश सर्व अनुभवावे लागले. अशा वेळी आपली म्हणणारी माणसे दूर जावू लागतात.

कुसुमाग्रजांच्या काव्यपंक्ती आहेत – 'एकच तारा समोर आणि पायतळी अंगार'. बँक जगली पाहिजे, वाढली पाहिजे, रोपाचे रूपांतर वटवृक्षात झाले पाहिजे अशा वेळी सर्व घटक, प्रेमाने, जिद्दीने, आत्मीयतेने, निष्ठेने, निर्धाराने, संस्था टिकविण्यासाठी काम करीत होते. अशी ही वेगळी 'यशोगाथा' आहे. अशा प्रकारचे समाज जीवनात उदाहरण नाही. अशा प्रकारच्या घटनांचे मराठीत चित्रण नाही. असे लिखाण हा सामजिक इतिहासाचा भाग असतो. त्याचे संदर्भ साधन असते. अशा प्रकारचे लिखाण जास्त व्हावयास हवे. हे काही गाईड नाही, प्रत्येक ठिकाणी प्रश्न तसेच नसतात, प्रश्न सोडविण्याचा मार्गही आखलेला नसतो. त्यामुळे हे पुस्तक जसेच्या तसे उपयोगी पडू शकत नाही. परंतु मार्गदर्शक नक्कीच ठरेल. मार्ग दाखविणारा असा हा अनुभवसिध्द 'प्रकाशाचा दिवा' आहे. अडचणीत त्याचा उपयोग नक्कीच होईल. अशा अडचणीच्या वेळी अखंड जागृती ही अस्तित्व टिकविण्याची किंमत असते. जागृती नसेल तर संस्था, समाज जीवन, राष्ट्र जीवन अडचणीत येवू शकते. कुठे चुकले, कसे चुकले, कसे दुरूस्त केले त्याचा हा इतिहास आहे. हा 'जगन्नाथाचा रथ' यशाच्या मार्गावर आणला. बँक हा विषय काढून टाकावा. वैयक्तिक संकटाच्या वेळी आत्मविश्वास असावा, ठाम निर्धार असावा. त्यासाठी अवश्य वाचावा. मला सहभागी केलं, आभारी आहे.

## टिळक रोड शाखेने यशस्वी केले विक्री अभियान

टिळकरोड शाखेने सहामाहीनंतर उद्दिष्टांचा आढावा घेऊन ''क्रॉस-सेलिंग'' उद्दिष्टांसाठी निश्चित कालावधीमध्ये १० नोव्हेंबर २०१४ ते २० नोव्हेंबर २०१४ या दहा दिवसासाठी लाईफ इन्शुरन्स व म्युच्युअल फंडस् विक्री अभियान घेण्याचे ठरविले.

गुंतवणूक विभागाचे प्रमुख व सहाय्यक महाव्यवस्थापक श्री. आनंद सोहोनी यांच्या हस्ते अभियानास प्रारंभ झाला.

शाखेतील सेवकांनी दहा दिवसामध्ये एकूण १७१ संदर्भ दोन्ही योजनांसाठी गोळा केले. यावेळी बँकेचे मा. संचालक श्री. भावेसाहेब, उपमहाव्यवस्थापक श्री. कामत साहेब, श्री. देवचक्के साहेब, सहा. महाव्यवस्थापक श्री. म्हैसकर, श्री. राधाकृष्ण लिमये, यांनी बँकेस भेट दिली. प्रशासन विभागातील अधिकारी श्री. बारवे, श्री. करमरकर यांनीही आवर्जून भेट दिली. त्याचबरोबर असोसिएशनचे माननीय अध्यक्ष श्री. पराग ठाकूर व अन्य पदाधिकारी यांनीही दिलेल्या भेटींमुळे सर्व सेवकांच्या उत्साहात निश्चितच वाढ झाली.

दि. २१.११.२०१४ रोजी मा. प्रशासन विभाग प्रमुख श्री. श्रीधर म्हसकर व मॅक्सचे रिजनल रिलेशनशिप मॅनेजर श्री. गायक सेनापती यांच्या उपस्थितीत अभियानाची सांगता झाली.

## चिंचवड स्टेशन शाखेचे अनोखे अभियान

चिंचवड स्टेशन शाखेतर्फे एप्रिल २०१४ पासून कासा डिपॉझीट अभियान अंतर्गत दर बुधवारी चिंचवड स्टेशन शाखेतील शाखा व्यवस्थापक श्री. बाबासाहेब जाधव, सहाय्यक शाखा व्यवस्थापक श्री. राजाराम सूर्यवंशी व सहकारी यांनी नवलाख उंबरे येथील अग्रगण्य ''जनरल मोटर्स'' इ. प्रा. लिमिटेड या कंपनीमध्ये जावून कासा डिपॉझीट बद्दल तेथील कर्मचाऱ्यांना विस्तृत माहिती दिली व त्यांची पगाराची व अन्य खाती उघडून घेतली. तीन कोटी कासा डिपॉझीट जमा झाले असून दरमहा साठ लाख रुपयापर्यंत विविध कर्मचाऱ्यांचे वेतन होत आहे. शाखेचे व्यवस्थापक व सहकाऱ्यांचे प्रयत्न प्रशंसनीय आहेत.

## ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त शुभेच्छा कार्यक्रम



शिवाजी नगर रत्नागिरी शाखेच्या वतीने जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त रत्नागिरी येथील ज्येष्ठ नागरिक संघाच्या सभासदांना शुभेच्छा देण्यात आल्या.

या कार्यक्रमाच्या वेळेस कोकण कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू व सध्याचे ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष श्री. श्रीरंग कद्रेकर व अन्य पदाधिकारी व सभासद सुमारे १०० जण उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या वेळेस ज्येष्ठ नागरिक संघाच्या आनंदाश्रम या प्रस्तावित नूतन कार्यालयासाठी शाखेतील सेवकांच्या वतीने रु. ५००१/- ची रोख देणगी देण्यात आली.

शिवाजीनगर रत्नागिरी शाखेचा हा उपक्रम प्रशंसनीय आहे.

## राष्ट्रीय कुमार बुध्दिबळ स्पर्धेचे उपाध्यक्षांच्या हस्ते उदघाटन



**खेळाडू श्री. अरविंद चिदंबरम त्याचप्रमाणे पुणे जिल्हा सेक्रेटरी श्री. निरंजन गोडबोले व आपल्या बँकेतील मार्केट यार्ड शाखेतील सेवक आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ पंच श्री राजेंद्र शिदोरे उपस्थित आहेत.**

नुकत्याच बालेवाडी पुणे येथे झालेल्या राष्ट्रीय कुमार बुद्धिबळ स्पर्धेचे शेवटच्या फेरीचे उद्घाटन बँकेचे उपाध्यक्ष श्री. संजय लेले यांनी केले या स्पर्धेमध्ये अठरा राज्यतील दोनशे खेळाडूंनी भाग घेतला होता त्यामध्ये पंधरा आंतरराष्ट्रीय खेळाडू होते. या स्पर्धेमध्ये मुलांमध्ये केरळचा स ल नारायण तर मुलींमध्ये तामिळनाडूचे सारण्य पहिले आले. दोनही खेळाडूंना जागतिक स्पर्धेमध्ये खेळण्याची संधी मिळणार आहे.

विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन!

## तळेगाव स्टेशन व तळेगाव दाभाडे शाखेतर्फे पतसंस्थांना मार्गदर्शन

बँका, आर्थिक संस्थांसाठी रिझर्व्ह बँकेचे काही नियम असून लवकरच पतसंस्थांनाही ते लागू होणार आहेत. के. वाय.सी. कर्जवाटप, अनुत्पादित कर्ज (एनपीए) असे काही महत्त्वाचे विषय समजावून देण्यासाठी आपल्या बँकेच्या गाव व स्टेशन या दोन शाखांतर्फे हॉटेल ग्रीनलीफमध्ये कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. तळेगाव, कामशेत, लोणावळा व मावळ तालुक्यातील पतसंस्थाच्या ४२ जणांनी याचा लाभ घेतला. मा. आ. कृष्णराव भेगडे यांनी नगराध्यक्षा सौ. सुलोचना आवारे यांच्या उपस्थितीत उद्घाटन केले.

प्रकाश कोंडपल्ले, आनंद सोहोनी, दिलीप कुलकर्णी, महेंद्र पवार यांनी उपयुक्त माहिती सांगितली. महेश काळे यांनी स्वागत, मंदार देशपांडे यांनी उपस्थितांचा परिचय तर किशोरभाई शहा यांनी आभार प्रदर्शन केले. रविंद्र दाभाडे यांनी उपस्थितांतर्फे बँकेचे आभार मानले.

## चिंचवडगांव शाखेच्या प्रामाणिकपणाची खातेदारांकडून प्रशंसा

श्री. लक्ष्मीकांत यशवंत क्षीरसागर हे आपल्या बँकेच्या चिंचवडगांव शाखेचे खातेदार, ठेवीदार असून बँकेचे सभासद आहेत. त्यांच्या लॉकरमधील काही मौल्यवान वस्तू त्यांच्या नजरचुकीने लॉकरबाहेर राहिल्या व आपले कर्मचारी श्री. अतुल लेंडघर यांना सापडल्या. त्यांनी अधिकारी श्री. अविनाश खेडकर यांच्याकडे दिल्या व त्यांनी त्या मौल्यवान वस्तू श्री. क्षीरसागर यांना त्यांच्या घरी जाऊन परत केल्या. बँकेच्या या प्रामाणिक व आपुलकीच्या वागण्याने क्षीरसागर यांना आनंद झाला व त्यांनी बँकेला पत्र पाठवून बँकेचे आभार मानून व प्रशंसा करून आपली कृतज्ञता व्यक्त केली आहे. श्री. खेडकर व श्री. अतुल लेंडघर यांचे अभिनंदन अशा सदवर्तनामुळेच आपल्या बँकेची प्रतिमा उज्ज्वल आहे.

# चिंचवडगांव शाखा व ज्येष्ठ नागरिक संघाद्वारे ज्येष्ठ नागरिक मेळावा आयोजित

८ नोव्हेंबर रोजी चिंचवडगांव शाखा व ज्येष्ठ नागरिक संघ, चिंचवडगांव यांचे संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ नागरिक मेळावा आयोजित केला होता. ज्येष्ठ नागरिक या मेळाव्याला मोठ्या संख्येने उपस्थित होते. 'ज्येष्ठ नागरिकांचे आर्थिक नियोजन व इतर समस्या' या विषयावर प्रमुख वक्ते व ज्येष्ठ विधिज्ञ मा. श्री. दादासाहेब बेंद्रे यांनी अतिशय ओघवत्या व सुंदर वाणीत सूचक दाखले देत उपस्थितांना मार्गदर्शन केले.

आपल्या भाषणात ते म्हणाले, 'मुलगा, सून, नातू यांच्या नावे नॉमिनेशन केले तर मुलांना आपण त्याचे मालक झालो आहोत असे वाटू लागते. परंतु ते 'मालक' होत नाहीत, तर 'विश्वस्त' होतात. ते इच्छापत्र नव्हे. इच्छापात्र हयातीत मृत्युपूर्वी कितीही करता येतात. परंतु जे इच्छापत्र शेवटचे असेल, तेच कायद्यानुसार ग्राह्य धरले जाते. केंद्राने जो ज्येष्ठांकरिता कायदा केला आहे, त्यास सरकार प्रसिध्दी देत नाही. या कायद्याची प्रसिध्दी ज्येष्ठ नागरिक संघाने करावी. या कायद्याने मुलगा, मुलगी, सून, नात, नातू अगर इतर वारसदारांना ज्येष्ठांना सांभाळणे बंधनकारक आहे. या कायद्याची अंमलबजावणी झाली, तर वृध्दाश्रमांची आवश्यकता भासणार नाही.

बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्री. वसंत कुलकर्णी, मुख्य अधिकारी मा. श्री. संतोष हिरवे, शाखा व्यवस्थापक श्री. चंद्रशेखर प्रभुणे, ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष श्री. कृष्णाजी जगताप व उपाध्यक्षा श्रीमती उषा गर्भे, श्री. मनोहर जांभेकर, श्री. जोशी, श्री. अविनाश भिडे, श्री. सूर्यकांत पारखी, श्री. गोपाळ कळमकार आदी उपस्थित होते.

आयोजन श्री.चंद्रकांत कोष्टी, श्री.रमेश इनामदार, श्री.चंद्रकांत पारखी, श्री. नारायण दिवेकर, श्री. तुकाराम सपकाळ, शाखा अधिकारी श्री. अविनाश खेडकर यांनी केले. गोपाळ भसे यांनी सूत्रसंचालन केले.

## श्री क्षेत्र देहू येथे मोबाईल द्वारे देणगी देण्यासाठी आपल्या बँकेने पुरविली सुविधा

आपल्या बँकेच्या वतीने श्री संत तुकाराम महाराज संस्थान, श्री क्षेत्र देहू येथे मोबाईलद्वारे देणगी देण्याच्या सेवा सुविधेचा उद्घाटन कार्यक्रम करण्यात आला. दि. १८ नोव्हेंबर २०१४ कार्तिकी एकादशीचे औचित्य साधून श्री संत तुकाराम महाराज संस्थान, श्री क्षेत्र देहू येथे मोबाईलद्वारे देणगी देण्याच्या सेवा सुविधेचा प्रारंभ केला. या प्रसंगी बँकेचे अध्यक्ष मा. श्री. अरविंद खळदकरसाहेब, मुख्यकार्यकारी अधिकारी मा. वसंत कुलकर्णी, संपर्क संचालक श्री. महेंद्र पवार, चिंचवडगांव शाखेचे अधिकारी श्री. अविनाश खेडकर व सेवक वर्ग तसेच श्री संत तुकाराम महाराज संस्थान देहू या संस्थेचे अध्यक्ष ह.भ.प. श्री रामदास ज्ञा. मोरे, विश्वस्त ह.भ.प. श्री. अशोक नि. मोरे, ह.भ.प. श्री. सुनिल दि. मोरे, ह.भ.प. श्री. शिवाजी मोरे उपस्थित होते.

जगभरातील कुठलीही व्यक्ती कोणत्याही वेळेला कोठूनही केवळ मोबाईल बँकिंगच्या (IMPS) द्वारे श्री संत तुकाराम महाराज संस्थान देहू या संस्थेला देणगी देऊ शकते व सदर देणगीचे पैसे संस्थानच्या खात्यामध्ये काही मिनिटांमध्ये जमा होऊ शकतात. या सुविधेद्वारे तंत्रज्ञान व श्री संत तुकाराम महाराजांची सेवा यांचा सुरेख संगम साधण्याचा प्रयत्न जनता बँकेने केला आहे असे श्री. अरविंद खळदकर यांनी आपल्या भाषणामध्ये सांगितले. श्री. वसंतराव कुलकर्णी यांनी उपस्थितांना तंत्रज्ञानावर आधारित असलेल्या या सुविधेचा वापर करण्याचे आवाहन उपस्थितांना केले.

मोबाईलद्वारे देणगी देण्याच्या सेवा सुविधेचे उद्घाटन श्री. अरविंद खळदकर यांनी केले व बँकेचे संगणक विभागाचे अधिकारी श्री. आशिष नवरे यांनी ही सुविधा वापरण्याबाबत पॉवरपॉईंट प्रेझेंटेशन सादर केले. देहू संस्थानला नुकतेच ८०-जी प्रमाणपत्र मिळाले व भाविकांसाठी अशाप्रकारे सुविधा उपलब्ध करून देणारी आपल्यासाठी जनता बँक ही पहिलीच बँक असल्याचे श्री संत तुकाराम महाराज संस्थान देहू या संस्थेचे अध्यक्ष ह.भ.प. श्री. रामदास ज्ञा. मोरे यांनी माहिते दिली यावर सर्व संस्थान विश्वस्तांनी आनंद व्यक्त केला.

## अनिता भावे यांना पीएचडी

आपल्या बँकेचे तज्ज्ञ संचालक श्री. विजय भावे यांच्या स्नुषा सौ. अनिता भावे यांना सावित्रीबई फुले पुणे विद्यापीठाची पीएचडी जाहीर झाली आहे. त्यांनी मानस, नीती आणि समाजविज्ञान विद्याशाखेंतर्गत अर्थशास्त्रामध्ये 'क्रिटीकल ॲनालिसिस ऑफ एफडीआय इन इंडिया' (१९९५-२०१०) या विषयावरील शोधप्रबंध सादर केला. डॉ. संहिता आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी संशोधन पूर्ण केले.

## शाखा वर्धापनदिनाच्या शुभेच्छा !



| | | | |
|---|---|---|---|
| १. कडवई शाखा | - २९ जानेवारी | ८. जुन्नर शाखा | - २६ फेब्रुवारी |
| २. तळेगाव दाभाडे शाखा | - २९ जानेवारी | ९. लातूर शाखा | - २६ फेब्रुवारी |
| ३. कर्वेनगर शाखा | - १ फेब्रुवारी | १०. टिळक रोड शाखा | - २७ फेब्रुवारी |
| ४. शिवाजीनगर पुणे शाखा | - ३ फेब्रुवारी | ११. शनिवार नारायण पेठ शाखा | - २७ फेब्रुवारी |
| ५. बाणेर शाखा | - १४ फेब्रुवारी | १२. औरंगाबाद शाखा | - २७ फेब्रुवारी |
| ६. तळेगाव स्टेशन | - १७ फेब्रुवारी | १३. इंदापूर शाखा | - २९ फेब्रुवारी |
| ७. चिंचवड स्टेशन शाखा | - २५ फेब्रुवारी | | |



# नवनिर्वाचित आमदार मा. शरद सोनावणे यांचा ओतूर शाखेतर्फे सत्कार



नुकत्याच संपन्न झालेल्या महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीमध्ये जुन्नर तालुक्यामधून निवडून आलेले नवनिर्वाचित आमदार मा. श्री. शरददादा सोनावणे यांनी ओतूर शाखेस सदिच्छा भेट दिली. ते बँकेचे सभासद, खातेदार सुद्धा आहेत. याप्रसंगी मा. शाखाव्यवस्थापक श्री. सुरेश पराड, सहा. शाखाव्यवस्थापक श्री. सतीश प्रयाग, अधिकारी श्री. संजय देशपांडे व सेवक वर्गाने त्यांचे स्वागत करून बहुमताने निवडून आल्याबद्दल अभिनंदन केले. मा. शाखाव्यवस्थापक व सहा. शाखाव्यवस्थपकांनी मा. शरददादांचा शाल व श्रीफळ देऊन यथोचित सत्कार केला. सत्कारास उत्तर देताना आमदारांनी बँकेवरील प्रेम व आस्था प्रकट केली व जुन्नर शाखेच्या विकासाबद्दल भविष्यकालीन नियोजन सांगितले. प्रसंगी स्थानिक सल्लागार समितीचे डॉ. भरत घोलप, श्री. रामदास तांबे मान्यवर खातेदार श्री. योंगेद्र देवकर व अन्य असंख्य स्थानिक ओतुरकर रहिवसी बँकेत उपस्थित होते. मा. शाखा व्यवस्थापक यांनी ओतूर शाखेची माहिती मा. आमदारांना दिली व मा. आमदारांनी भविष्यकालीन शुभेच्छा व्यक्त केली. अन्य वक्त्यांनी सुद्धा आपल्या भावना व्यक्त केल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार सेवक श्री. सूर्यकांत इंगुळकर यांनी केले.

# बाणेर शाखेमार्फत चित्रकला स्पर्धेचे आयोजन

आपल्या बँकेच्या बाणेर शाखेने विविध ३ गटांमध्ये चित्रकला स्पर्धा आयोजित केली होती. यामध्ये वय वर्षे ७ ते १०, १० ते १४ व १४ ते १७ वर्षे या गटांचा समावेश होता.

सर्व गटांमध्ये मिळून ३०० मुलांनी यामध्ये भाग घेतला. प्रत्येक गटामध्ये प्रथम द्वितीय तृतीय व उत्तेजनार्थ अशी पारितोषीके देण्यात आली.

सुवर्ण, रजत व कास्य अशी ३ पदके मुलांना देण्यात आली. पदकांसमवेत प्रमाणपत्र व गुलाबपुष्प देण्यात आले. या कार्यक्रमास सिनीयर प्रोफेसर व शाखेचे प्रतिष्ठित खातेदार मा. श्री. संजय कांदळगांवकर सर हे प्रमुख पाहुणे म्हणून होते. मुख्यकचेरी मार्फत बँकेचे मा. सीईओ श्री. कुलकर्णी साहेब, व नियोजन विभाग प्रमुख मा. श्री. आपटे साहेब उपस्थित होते. वरील मान्यवरांचे हस्ते सर्व विजयी विद्यार्थ्यांना बक्षीसे देण्यात आली.

# जैन महाविद्यालयात उद्घाटन प्रसंगी श्री. खेडकरांनी केले विद्यार्थ्यांचे उद्बोधन

चिंचवड – श्री जैन विद्या प्रसारक मंडळ संचलित श्री. फत्तेचंद जैन कनिष्ठ महाविद्यालयात संस्थेच्या बापू भन्साळी हॉलमध्ये वाणिज्य मंडळाचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून संस्थेचे मानद सरचिटणीस ॲड. राजेंद्रकुमार मुथा आणि उद्घाटक म्हणून सहाय्यक सचिव व शालेय समिती अध्यक्ष अनिलकुमार कांकरिया उपस्थित होते.

या कार्यक्रमास चिंचवडगांव शाखेच्या वतीने वरिष्ठ अधिकारी श्री. सचिन ढवळे, ज्यु. ऑफिसर श्री. अविनाश खेडकर, लेखनिक श्री. गुरूदत्त मुळे हे व बँकेच्या मुख्य कार्यालयामार्फत डाटा सेंटर मधील चीफ ऑफिसर श्री. निलेश देशपांडे उपस्थित होते.

या कार्यक्रमामध्ये श्री. खेडकर यांनी वाणिज्य शाखेच्या इयत्ता ११ वी व १२ वी च्या विद्यार्थ्यांना वाणिज्य शाखेतील करिअरच्या संधी व बँकेच्या चिरंजीव ठेव योजनेची माहिती सांगितली. श्री. निलेश देशपांडे यांनी पॉवर पॉईंट प्रेझेन्टेशनमार्फत टेक्नोबेस्ड सर्व्हिसेसची माहिती उपस्थित विद्यार्थ्यांना सांगितली. शाळेचे प्राचार्य श्री. कटारिया यांनी बँकेने वेळोवेळी केलेल्या सहकार्याबद्दल आभार मानले.

प्रास्ताविक प्राचार्य प्रकाश कटारिया यांनी केले. पाहुण्यांचा परिचय उपप्राचार्य के.एन. विश्वासराव यांनी करुन दिला. प्रा. व्ही. बी. काळे यांनी आभार मानले.

## माहे ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१४ मध्ये निवृत्त झालेले सेवक

**श्री. अविनाश मु. इनामदार**
(चिंचवडगाव शाखा) कनिष्ठ अधिकारी

**श्री. शिरीष वि. बढे**
(टिळक रोड शाखा) लेखनिक

**पुढील आयुष्यात आपल्याला उदंड सौख्य व निरामय दीर्घायुष्य लाभो !!**

पान क्र. १ वरून ▶

## आपल्या बँकेने प्राप्त केली बँकिंग फ्रंटियर्स अॅवॉर्डस!

विविध खातेदार, हितचिंतक भावी खातेदार यांचेशी संपर्क साधण्यासाठी बल्क इमेल मोड्यूलचा वापर केला जातो. कर्जप्रकरणाची छाननी करण्याकरिता ऑनलाईन लोन स्क्रुटीनी मोड्यूल उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. ब्रँच ऑडीट मोड्यूल द्वारा ऑडीट रिपोर्ट उपलब्ध करून देण्यात येतात. रिकव्हरी मोड्यूल द्वारे दावा दाखल खात्यांबाबत अद्ययावत माहिती ठेवण्यात येते. या शिवाय नजीकचे भविष्यात ई केवायसी व ई ट्रेनिंग हे दोन उपक्रम हाती घेण्यात येणार आहेत.

२) बेस्ट डेटा सेंटर बेस्ट आय.टी. हेड – बँकेचे डेटा सेंटर २००५ सालापासून कार्यान्वीत असून, डिझास्टर रिकव्हरी साईट २००६ साला पासून कार्यान्वीत आहे. या दोन्हींना आयएसओ सर्टिफिकेशन २००७ साली मिळाले. तसेच क्वॉलीटी मॅनेजमेंट सिस्टीम बाबत ९००१ : २००८ हे ही सर्टिफिकेशन मिळालेले आहे. तेथे काम करणाऱ्या सर्व सेवकांना विशेष प्रशिक्षण देण्यात आलेले आहे व रिझर्व्ह बँकेच्या विविध नियमावलींचे काटेकोर पालन केले जाते. आवश्यक त्या कालावधीनंतर डि.आर.ड्रील केले जाते. या शिवाय RTGS, NEFT, Rupay ATM cum Debit card, Mobile Banking (IMPS), Cheque Truncation System SMS Banking, Internet Banking, Mega Banker, Demat Services, Aadhar Card Link, ASBA (Application supported by blocked amount) Document Printing System वगैरे सुविधा उपलब्ध आहेत. हेल्प डेस्क सुविधा उपलब्ध करून विविध अडचणींचे त्वरीत निराकरण केले जाते. उपरोक्त डेटा सेंटर व डि.आर. साईट या इन्फ्रास्ट्रक्चर फॅसिलीटीज इतर बँकांनाही उपलब्ध करून दिल्या जातात. डेटा सेंटरचे गेल्या वर्षी नूतनीकरणही करण्यात आलेले आहे. नवीन तंत्रज्ञानाच्या वापराद्वारे मोठ्या प्रमाणामध्ये खर्चामध्ये बचत साध्य केलेली आहे.

३) बेस्ट एनपीए मॅनेजमेंट – गेल्या वर्षी रु. १५.८१ कोटी एवढी एनपीए खात्यांमध्ये वसुली करण्यात आली. आरबीट्रेटर द्वारा २९ अॅवॉर्डस मिळाली, SARFAESI कायद्यांतर्गत ६४ खात्यात कारवाई करण्यात आली. ऑनलाईन एनपीए व प्रोबॅबल एनपीए आयडेन्टीफिकेशन ही मोड्यूल्स वापरात आणली. शाखा व वरिष्ठ अधिकारी यांचेमध्ये थकीत कर्ज वसुलीबाबत दरमहा मिटींग घेण्यात आल्या. २५ लाख रूपयांपेक्षा जास्त रक्कमांची एनपीए खाती हेडऑफिस मधील वरिष्ठ अधिकाऱ्यांमध्ये विभागून सतत त्यांचा पाठपुरावा व रिव्ह्यू घेण्यात आला.

विशेष वसुली अधिकाऱ्यांनी शाखांकडे सतत पाठपुरावा केला. वसुलीस कठीण अशा खात्यांबाबत विशेष असे प्रयत्न केले गेले. आवश्यकता भासल्यास व्याजात सूट देण्यात आली. राईट ऑफ अकौंटमध्ये वसुली करण्याकरिता विशेष प्रयत्न केले गेले.

४) उत्कृष्ट शाखा पुरस्कार – बाजीराव रोड शाखेस हा पुरस्कार देण्यात आला. या शाखेचे नूतनीकरण करून शाखा ही संपूर्ण वातानुकुलीत करण्यात आली. खातेदार व सेवक यांना सोईचे होईल असे आकर्षक इंटिरिअर डेकोरेशन करण्यात आले. खातेदारांना चांगल्या सुविधा देण्याच्या दृष्टीने शाखा २ मजल्यांवर विभागण्यात आली. शाखेचा एकूण व्यवहार १००० कोटींपेक्षा जास्त झालेला आहे. रोजची उलाढल ही रु. १० कोटी पेक्षा जास्त असून ४००० इतकी चलने हाताळली जातात. रोज अंदाजे ९०० खातेदार शाखेस भेट देतात. ४५,००० बचत ठेव खाती, ३,००० चालू ठेव खाती व ९०,००० मुदत ठेव खाती शाखेकडे आहेत. खातेदारांना विदेश विनिमय विभागाच्या सुविधाही उपलब्ध करून दिलेल्या आहेत. शाखेकडील कर्ज खाती रु. ५,०००/- पासून रु. ४५ कोटी पर्यंतची आहेत. ३०% कर्ज खाती ही रू. २५ लाख पेक्षा कमी रक्कमेची आहेत व ३५% ठेवीदार हे छोटे ठेवीदार आहेत. लॉकर विभागही संगणकीकृत करण्यात आला आहे. एटीएम, मेगा बँकर अशा सुविधा शाखेकडे उपलब्ध आहेत. शाखेने लॉबी मॅनेजर अशी अभिनव संकल्पना वापरून खातेदारांच्या अडचणी सोडविण्याची सोय केलेली आहे. शाखेकडे २८०० खातेदार डिमॅट सर्व्हिसेस वापरतात. शाखेचा प्रत्येक कर्मचाऱ्यामागे असलेला व्यवसाय रू. १८.७० कोटी आहे.

## बँकिंग परिक्षांमधील यशाचे मानकरी — अभिनंदन !

### JAIIB

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीमती वर्षा वसंत कुलकर्णी | – कनिष्ठ अधिकारी, तळेगाव दाभाडे शाखा |
| २. | श्री.मकरंद माधव जोशी | – कनिष्ठ अधिकारी, टिळक रोड शाखा |
| ३. | श्री. प्रशांत गजानन पाटणकर | – कनिष्ठ अधिकारी, नेट बँकिंग सेल |
| ४. | श्री. उमेश गणपत उदगांवकर | – कनिष्ठ अधिकारी, सीआयसीडी विभाग |
| ५. | श्री. कमलाकर सुधाकर इनामदार | – लेखनिक, मार्केटयार्ड शाखा |
| ६. | श्री. अनिरुद्ध श्रीधर पळशीकर | – लेखनिक, एमआयएस विभाग |
| ७. | श्री. अनंत दत्तात्रय बापट | – लेखनिक, माखजन शाखा |

## वाह बच्चों!लगे रहो!!

आपल्या मुख्य कचेरी ऑडीट विभागातील सेवक श्री. विजय क्षीरसागर यांची कन्या कु. गायत्री क्षीरसागर हिने एम.आय.टी. कॉलेज मधून इलेक्ट्रॉनिक अॅन्ड टेलिकम्युनिकेशन या विषयात मास्टर इंजिनिअरिंग यशस्वीरित्या पूर्ण केले आहे. तिने या विषयात सुवर्णपदक प्राप्त केले असून दोन्ही वर्षी प्रथम क्रमांक पटकावला आहे. या विषयावर तिने राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थांकडे Research Papers सादर केले असून सर्व ठिकाणी तिला प्रशस्तीपत्रक व पारितोषिके मिळाली आहेत.

मुख्यकचेरी ऑडीट विभागातील सेवक श्री. ज्ञानेश्वर वि. चिल्लाळ यांचा मुलगा आयुष ज्ञानेश्वर चिल्लाळ याने एस.आय.पी. अॅकॅडमी यांचे तर्फे घेण्यात आलेल्या अबॅकस परीक्षेत फिफ्थ लेव्हल पार केली, त्यामध्ये त्याला १०० पैकी १०० गुण मिळाले. तसेच सिक्स्थ लेव्हल मध्ये १०० पैकी ९७ मार्क व फर्स्ट रँक मिळवली आहे.

मुलांनो तुमचे हार्दिक अभिनंदन व तुमच्या उज्ज्वल भवितव्यासाठी तुम्हाला भरपूर शुभेच्छा!

# Cyber Crime

In the previous issue we discussed about some of Cyber Crimes. In this issue we will discuss a few more of similar Crimes.

**Email Spoofing:-**

A spoofed email is one that appears to originate from one source but actually has been sent from another source. e.g. A hacker spoofs email address of person ''X'' and sends malicious mesages to other persons. Since the email appears to have been generated from ''X'', the persons who receive the said email may register compliant and relation with the original ''X'' may get spoiled for lifetime.

**Forgery :-**

Documents like academic certificates, mark sheets, currency notes, stamp papers etc. made by criminals using computers, printers and scanners are some of the forgery related crimes. In the year 1995, Economic Offences Wing of Crime Branch, Mumbai seized over 22,000 counterfeit share certificates of 8 reputed companies. These were allegedly prepared using Desktop Publishing.

**Cyber Defamation :-**

Defamation takes place by using computers and / or Internet. One person publishes defamatory matter about some other person on website or sends emails containing defamatory information to relatives / friends of victim. Most of the girls and women are victims of such type of crimes. Criminal creates a fake account in the name of the victim and sketches victim's profile in such a way that it attracts attention by nasty comments from many who visited victim's profile.



**Cyber Stalking :-**

Cyber stalking is to hunt for a person by using Internet, email or other types of electronic communication devices. It involves harassing/threatening by appearing at a victim's home or office place, making phone calls, leaving written messages or by injuring / destroying maliciously.

**Web Defacement :-**

It is normally the substitution of the original home page of a website with another page created by hacker/criminal. This type of crime not only takes place for political reasons but criminal may do it for thrill or for financial gains as well. In such type of attacks corporations, government sites and religious sites are regularly targeted by hackers/criminals. Website represents the image of company / organization / institute and these are therefore vulnerable to defacement. Visitor may loose faith in sites that compromises security and will become attentive security and will become attentive while performing online transactions. In case of web defacement, sites have to be shut down for repairs for a long period.

**Email Bombing :-**

It refers to sending a large number of emails to the victim resulting in victim's email account or mail server getting crashed. This is a type of denial of service (DOS) attack. A DOS attack is one which brings the system to its knees thus making the server inaccessible.

**Data Diddling:-**

Most common form of cyber/computer crime is data diddling. Data diddling is illegal or unauthorized data alteration / modification / mutation. These changes may take place before or during data input or before output / result. These type of crimes have affected banks, payrolls, inventory records etc.

**Salami Attacks:-**

These type of attacks are committed for financial gains/crimes. In this attack data alteration is so insignificant that in a single case it would go unnoticed. e.g. A bank staff member installs a program into the bank's server, that duducts a small amount of money from every customer account and transfer it to assigned account. No account holder will notice this illegal /unauthorized debit in his/her account. But criminal will make / collect a sizeable amount on every attempt of execution of program installed on server.

Like these, there are many other types of crimes evolving out of cyber space. We will discuss some of those in detail in the next issue.

**- Ashish Naware**
IT Department

गरूड झेप

गरूड झेप ही गृहपत्रिका केवळ खाजगी वितरणासाठी प्रकाशित केली आहे. यातील मते व्यक्तिगत असून बँक त्याचेशी सहमत असेलच असे नाही.
गृहपत्रिकेसाठी लिखाण, सूचना इ. साठी मनुष्यबळ विकास विभाग, मुख्य कचेरी येथे संपर्क करावा.
दूरध्वनी : ०२०-२४४५०५४०, मो. नं. ९९७०८००३४८. संपादकीय समन्वय : भालचंद्र कुलकर्णी, जनसंपर्क अधिकारी (मोबा. : ९८२२८८२५०९)